क्र/यजिप/शिवी/माध्य/...१२९..../२०११
कार्यालय शिक्षण विभाग (माध्य)
जिल्हा परिषद,यवतमाळ
दिनांक २१/०६/२०११

प्रति,

मुख्याध्यापक,
माध्य/उच्च माध्य.शाळा,
यवतमाळ जिल्हा.

विषय :- महाराष्ट्र मोटार वाहन (स्कुल बस करिता विनियम) नियम २०११ अंतर्गत

संदर्भ :- १. शासन अधिसुचना क्र.एम.व्ही.आर.८०८/प्र.क्र.१५३/परि-२/दि.२२/३/२०११

२.मा.शिक्षण संचालक,माध्य व उच्च यांचेकडील पत्र क्र.संकीर्ण २०११/१४१०३ /१५क/(०८) ७८९५ ,महाराष्ट्र राज्य पुणे दि.१६/५/२०११

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणास सुचित करण्यात येते की,प्रस्तुत नियमावली मधील नियम ५ नुसार प्रत्येक शाळेसाठी त्या शाळेचा मुख्याध्यापक यांच्या अध्यक्षतेखाली एक परिवहन समिती गठित करण्यात यावी .

सदर समिती मध्ये मुख्याध्यापक हे अध्यक्ष स्थानी असून इतर सदस्यांमध्ये एक पालक शिक्षक संघाचा प्रतिनिधी,संबंधीत क्षेत्राचा वाहतुक निरीक्षक किंवा पोलिस निरीक्षक,त्या क्षेत्राचा मोटार वाहन निरीक्षक किंवा सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक शिक्षण निरीक्षक,बसच्या कंत्राटदाराचा प्रतिनिधी आणि स्थानिक प्राधिकरणाचा प्रतिनिधी यांचा समावेश असेल समितीची किमान तीन महिन्यातून एकदा प्रत्येक सत्र सुरू होण्यापुर्वी बैठक घेण्यात यावी.

शाळेतील मुलांची सुरक्षितपणे ने आण करणे.परिवहन शुल्क,बस थांबे निश्चित करणे,या बाबीकडे ही समिती लक्ष देईल.

शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीसंबंधी महाराष्ट्र मोटार वाहन (स्कुल बस करिता विनिमय) नियम २०११ बाबत दि.२२/३/२०११ च्या शासन अधिसुचनेअन्वये कार्यवाही करावी. व तसा अहवाल या कार्यालयाकडे अविलंब सादर करावा.

शिक्षणाधिकारी (माध्य)
जिल्हा परिषद,यवतमाळ

प्रतिलिपी :-

१. मा.शिक्षण संचालक,माध्य व उच्च माध्य,शिक्षण संचालनालया,म.रा.पूणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा.शिक्षण उपसंचालक,अमरावती विभाग,अमरावती यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. मा.उपप्रादेशिक परिवहन अधिकारी,यवतमाळ यांना माहितीस्तव सादर.
४. गटशिक्षणाधिकारी (सर्व) पं.स........................जि.प.यवतमाळ यांना माहिती तथा अनुषंगिक कार्यवाहीस्तव अग्रेषित.